




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784



वर्ष ३ रे    अंक : २३ वा    गुरूवार    दि. २०    फेब्रुवारी    २०२५    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# प्रगट दिनाला समृद्धीवर हाहाकार!

## भीषण अपघातात दोन जळून खाक, एक गंभीर!

**जनसंचलन/बुलढाणा**

संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनी समृद्धी महामार्गावर भीषण अपघाताने हाहाकार उडवला! दुसरबीड येथे मुंबईवरून अकोल्याकडे जात असताना गाडीचा भीषण अपघात झाला, ज्यात दोन जण जागीच जळून खाक झाले, तर एकजण गंभीर जखमी आहे. अपघात एवढा भयानक होता की संपूर्ण परिसर हादरला. महामार्गावर मोठा आवाज झाला आणि पाहता पाहता गाडीने आगीच्या ज्वाळांनी वेढले. शेतात काम करणाऱ्या लोकांनी ही दुर्घटना पाहताच मदतीसाठी धाव घेतली, मात्र आग इतकी भडकलेली होती की आत अडकलेल्या दोघांचा जागीच मृत्यू झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, गाडीत एकूण तीन जण होते. त्यातील ड्रायव्हर गंभीर जखमी असून त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या दुर्घटनेमुळे समृद्धी महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. घटनास्थळी पोलीस आणि आपत्कालीन सेवांनी तत्काळ धाव घेतली

# शिवजयंती उत्साहात साजरी

**जनसंचलन/बुलढाणा**

रायपूर नगरीमध्ये १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती अति उत्साहात साजरी करण्यात आली. हनुमान चालीसा मंडळाच्या वतीने सकाळी पाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज व हनुमान मूर्तीवर रुद्र अभिषेक करण्यात आले. जय राजे मित्र मंडळाच्या वतीने शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून कार्यक्रमाची सांगता झाली. सायंकाळी पाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य दिव्य रॅली काढण्यात आली. जय राजे मित्र मंडळ यांच्या वतीने दरवर्षी मोठ्या उत्साहात शिवजयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या मिरवणूकीचे आकर्षण म्हणजे, आम्ही चिखलीकर ढोल पथक, घोड्यावर विराजमान मा जिजाऊ, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, मावळे, चोपदार, रायपूर भजन मंडळी व इतर रथ. भव्य दिव्य महाराजांची सिंहासनावर लाइटिंगच्या व फुलांच्या सजावटीमध्ये अरुढ मूर्ती, फटाक्यांच्या आतिषबाजी मध्ये छत्रपती शिवरायांची ऐतिहासिक मिरवणूक काढण्यात आली. रायपूर नगरीत दिवाळीप्रमाणे दीपोत्सव साजरा करण्यात आला, घरासमोर सडा रांगोळी काढून राजांचे स्वागत करण्यात आले. सर्व धर्मीय बांधवांच्या सहभाग या जयंती मध्ये असतो. मुस्लिम बांधवांकडून शरबत वाटप करण्यात आले. यामध्ये रायपूर नगरीत हिंदू मुस्लिम एकोप्याचे दर्शन घडून आले.

# आज शेगाव नगरी गण गण गणात बोते नामाच्या जयघोषणाने दुमदुमणार...

**जनसंचलन/शेगाव**

महाराष्ट्रातच नव्हे तर देशविदेशातील असंख्य तर भक्तगणांचे श्रद्धास्थान असलेले शेगावचे संत श्री गजानन महाराज, यांचा प्रकट दिन माघ वद्य सप्तमीला सर्वत्र अतिशय उत्साहाने साजरा होतो. यंदा, २० फेब्रुवारी २०२५ रोजी गजानन महाराज प्रकट दिन आहे. गुरुवारी गजानन महाराज प्रकट दिन येणे शुभ मानले गेले असून, या दिवशी केलेले श्री गुरुंचे नामस्मरण, आराधना, उपासना, मंत्रांचा जप, विशेष पूजन लाभदायक आणि पुण्य फलदायी मानले गेले आहे. राज्यासह देशात आणि परदेशातही गजानन महाराजांचे मठ आहेत. या मठात नित्यनेमाने भाविक जातात आणि महाराजांचे दर्शन घेतात. गण गण गणात बोते हा केवळ साधा मंत्र नसून, तो सिद्ध मंत्र आहे. या मंत्राचा अर्थ नीट समजून घेतला आणि त्यानंतर त्याचा यथाशक्ती जप केला, तर अधिक चांगल्या पद्धतीने सेवा करता येऊ शकेल. माघ वद्य सप्तमी म्हणजे २३ फेब्रुवारी १८७८ रोजी बुलडाणा येथील शेगाव येथे गजानन महाराज दिगंबर अवस्थेत लोकांच्या दृष्टीस पडले. श्री गजानन महाराजांचा जन्म कुठे व कधी झाला हे अज्ञात आहे. गण गण गणात बोते, हा त्यांचा आवडता मंत्र. ते याचा अखंड जप करत असत. गजानन महाराजांचे लाखो भक्त यथाशक्ती हा मंत्र जपत असतात. या मंत्राचा जयघोष केला जातो. गजानन महाराज यांचे चरित्र अनेक प्रकारच्या चमत्कारिक कथांनी भरलेले आहे, असे सांगितले जाते. सामान्य दिसणारी व्यक्ती एक योगी पुरुष आहे, याची जाणीव लोकांना झाली, तेव्हा लोकांनी गजानन महाराजांचा ध्यास घेतला. आपली दु:खे, अडचणी सांगून त्यातून मार्ग दाखवा अशी या सिद्धपुरुषाला विनवणी केली. तेव्हा गजानन महाराजांनी समस्त भक्तांना एकच मंत्र दिला, तो म्हणजे गण गण गणात बोते! आधी अर्थ जाणून घ्या अन् मगच अखंड जपा गण गण गणात बोते गजानन महाराज कोणत्याही घटनेविषयी सांगताना अचूकपणे ओव्या व ऋचा सांगून त्यांचे स्पष्टीकरण करीत असत. महाराज अंतर्ज्ञानी होते. त्यांचे बोलणे भरभर, परंतु त्रोटक असे. बोलत असताना समोरील व्यक्तीकडे न पाहता भिंतीकडे पाहत किंवा स्वतःमध्ये मग्न राहून ते बोलत असत. अनेक लोकांना दु:ख,




संकटे, रोग यांपासून मुक्त करून सन्मार्गाला लावले. गण गण गणात बोते हा केवळ मंत्र नाही तर भगवंताच्या अस्तित्वाची पदोपदी होणारी जाणीव आहे, असे सांगितले जाते. गण गण गणात बोते या मंत्राचा अर्थ लक्षात घेतला, तर ते समजू शकेल. पहिला गण म्हणजे जीव, दुसरा गण म्हणजे शिव, गणात म्हणजे हृदयात, बोते म्हणजे बघा! प्रत्येकाने हृदयस्थ परमेश्वर बघायला शिका. तो केवळ तुमच्यातच नाही, तर प्रत्येक जीवात्म्याच्या ठायी आहे. त्याचा आदर करा. ज्याला परमेश्वराचे रूप पाहता आले, तो कधीच कोणाशी वाईट वागणार नाही आणि स्वत:ही वाईट कृत्य करण्यास धजावणार नाही. गजानन महाराजांच्या मंत्रानुसार गण गण गणात बोते अर्थात आत्मा आणि परमात्मा यांची भेट होणे. ही जाणीव हृदयात नित्य होत राहावी आणि भगवंत भेटीची आस लागावी, म्हणून आपणही गजानन महाराजांच्या प्रगट दिनाचे औचित्य साधून यथाशक्ती या सिद्ध मंत्राचा जप केल्यास पुण्य मिळू शकते, असे म्हटले जाते.

# कोठारी शिक्षण आयोग शिफारस: बालभारती स्थापन!

## संपादकीय लेख

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ही महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाअंतर्गत वसंतराव नाईक सरकारच्या कारकिर्दीत २७ जानेवारी १९६७ रोजी स्थापन केलेली संस्था असून बालभारती या नावाने ती ओळखली जाते. महाराष्ट्रातील शालेय अभ्यासक्रमासंबंधी संशोधन करणे, त्यानुसार शालेय अभ्यासक्रम तयार करणे, या अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके तयार करणे आणि विद्यार्थ्यांना कमीत कमी व योग्य दरात तसेच वेळेवर पुस्तके उपलब्ध व्हावीत अशा पद्धतीने मुद्रण आणि वितरणाची व्यवस्था करणे ही कार्ये ही संस्था करते. संस्थेचे मुख्य कार्यालय पुण्यात आहे. तसेच औरंगाबाद आणि नागपूर येथे संस्थेची विभागीय कार्यालये आहेत. केवळ बालभारती या नावानेही ती ओळखली जाते. याबद्दलची रोचक व ज्ञानवर्धक संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात प्रस्तुत केली आहे... संपादक.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ हे बालभारती प्रकाशनाद्वारे इयत्ता पहिली ते बारावीची सर्व विषयांची मिळून जवळपास चार कोटी पाठ्यपुस्तके छापून वितरित करते. पुस्तकांचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी राज्यात सध्या नऊ भांडारे आहेत. निरीक्षण, निवेदन, वर्गीकरण, तुलना, सहसंबंध, कार्यकारणभाव, उपयोजन, प्रयोगकौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, अनुमान काढणे, या क्षमता आत्मसात कराव्या, तसेच विज्ञानाच्या अभ्यासातून आवश्यक ते जीवन कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे, असा व्यापक दृष्टिकोन या पुस्तकनिर्मितीमागचा आहे. दरवर्षी सुमारे १९ कोटी पुस्तकांची छपाई करून त्यांचे वितरण बालभारती मार्फत केले जाते. महाराष्ट्रातील एक लाखाहून अधिक शाळांमधून बालभारतीची पुस्तके वापरली जातात. या पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्थापनेपूर्वी शाळांमध्ये खाजगी प्रकाशकांची पुस्तके वापरात होती. या पुस्तकाचा दर्जा, किमती मधील तफावत, त्यांची उपलब्धता, शाळेत पुस्तक लावताना होणारे गैरव्यवहार याबाबींची दखल कोठारी आयोगाने घेतली. दर्जेदार आणि रास्त किमतीमधील पुस्तके मुलांना वेळेत मिळावी यासाठी राज्याने स्वायत्त संस्था निर्माण करावी, अशी शिफारस करण्यात आली. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार तत्कालीन वसंतराव नाईक सरकारने २७ जानेवारी १९६७ला महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे या संस्थेची स्थापना केली. याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते दोन फेब्रुवारी १९६७ला झाले. मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांच्याकडे सोपविण्यात आली. तर मंडळाचे पहिले संचालक उत्तमराव सेवलेकर आणि पहिले नियंत्रक म्हणून शिक्षणतज्ज्ञ बापूराव नाईक होते. संस्थेचा सध्याचा पत्ता- बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ००४ असा आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ म्हणजे शैक्षणिक विकास व संशोधन करणारे मंडळ होय. ते दि.२७ जानेवारी १९६७ रोजी पुणे येथे स्थापन झाले. शालेय विद्यार्थ्यांना रास्त दरात दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध होण्यासाठी राज्यस्तरावर काम करणाऱ्या स्वायत्त संस्थेकडे पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे काम सोपवावे, अशा स्वरूपाची शिफारस कोठारी शिक्षण आयोगाने सन १९६६ साली केली होती. तिला अनुसरून या मंडळाची स्थापना झाली. प्रस्तुत मंडळ ही एक सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे.

मंडळाची उद्दिष्टे- १) शालोपयोगी पाठ्यपुस्तके, शिक्षकांकरिता हस्तपुस्तके व विद्यार्थ्यांसाठी व्यवसायपुस्तके तसेच शिक्षणविषयक इतर साहित्य तयार करणे, २) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आणि शिक्षणाच्या इतर शाखा यांतील अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांच्या सुधारणेसाठी तसेच पाठ्यपुस्तक निर्मिती, साहाय्यभूत शैक्षणिक साधने आणि विविध शिक्षणसाधने यांवरील साहित्याविषयी संशोधन करणे, ३) शिक्षणाच्या सर्वसाधारण दर्जामध्ये सुधारणा व्हावी या हेतूने अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करणे, त्याचा विकास करणे आणि शासनास किंवा अन्य योग्य प्राधिकरणास त्याची शिफारस करणे, ४) सर्व शाखांमध्ये शिक्षणाची प्रगती व्हावी यासाठी उपयुक्त किंवा आवश्यक अशा पुस्तकांचे व साहित्याचे मुद्रण, विक्रय व वितरण करणे, ५) शासनास देणगीदाखल मिळालेल्या कागदपत्रांचा संग्रह व उपयोग करणे आणि त्यासंबंधीचा हिशोब ठेवणे तसेच शासनाच्या वतीने पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्याविषयी योजना कार्यान्वित करणे, ही आहेत. मंडळाचे पुढीलप्रमाणे नऊ विभाग पाडण्यात आले आहेत- १) विद्याविभाग, २) सामान्य प्रशासन विभाग, ३) वितरण विभाग, ४) वित्त विभाग, ५) अंतर्गत-लेखापरिक्षण विभाग, ६) निर्मिती विभाग, ७) संशोधन विभाग, ८) ग्रंथालय विभाग, ९) किशोर विभाग. मंडळाचे मुख्य कार्यालय पुणे येथील बालभारती नामक इमारतीत असून निर्मिती विभाग वरळी,मुंबई येथे आहे. यांशिवाय पुणे, नागपूर, मुंबई-गोरेगाव व औरंगाबाद या चार ठिकाणी मंडळाची पाठ्यपुस्तक-भांडारे व वितरण केंद्रे आहेत. राज्यातील शैक्षणिक संस्थांनी मंडळाकडे नोंदणी करून क्रमिक पुस्तकांची मागणी केल्यास पुस्तक-विक्रेत्यांप्रमाणेच शैक्षणिक संस्थांना पुस्तकांच्या खरेदी किंमतीवर १५ टक्के वटाव दिला जातो. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये क्रमिक पुस्तकांचे वितरण सहकारी संस्थेमार्फतच केले जाते. मंडळाच्या धोरणविषयक सर्व बाबी नियामक मंडळ आखते व या नियामक मंडळातर्फेच पाठ्यपुस्तक मंडळाचे व्यवस्थापन चालते. राज्याचे शिक्षणमंत्री व शिक्षण संचालक हे मंडळाचे अनुक्रमे पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष आहेत. नियामक मंडळावर या दोघांसह नऊ पदसिद्ध व सहा अपदसिद्ध सदस्य असतात. अपदसिद्ध सदस्यांची नियुक्ती शासनातर्फे सर्वसाधारणपणे दर तीन वर्षांनी होते.

मंडळाचे व्यवस्थापन पुढील समित्यांमार्फत चालते- १) कार्यकारी समिती, २) वित्त समिती, ३) विद्यापरिषद, ४) संशोधनसल्लागार परिषद व ५) निर्मिती व वितरण परिषद. मंडळाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार अधिक समित्या व उपसमित्या नियुक्त करण्याचे अधिकार नियामक मंडळास आहेत. अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी भाषा विषयांच्या एकूण सात समित्या मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, सिंधी, इंग्रजी या आहेत. तसेच इतिहास, भूगोल, गणित, शास्त्र, या भाषेतर विषयांसाठीही समित्या आहेत. मंडळाच्या स्थापनेच्या वेळी शासनाने त्यांच्याकडील उपलब्ध पाठ्यपुस्तके किंमत रु.४२८१ लक्ष तसेच रोख २७६० लक्ष रु.वेळोवेळी कर्जरूपाने दिले. त्या सर्व रकमेची मंडळाने व्याजासह परतफेड केली आहे. मंडळाला दरवर्षी लागणारे खेळते भांडवल सुमारे ८ ते १० कोटी रु.हे बँकांकडून कर्जरूपाने पुस्तकसाठ्याच्या तारणावर वेळोवेळी मिळविले जाते व त्याची परतफेड पुस्तकविक्रीद्वारे मिळालेल्या रकमेतून केली जाते.

पाठ्यपुस्तकांची निर्मितीमंडळ अस्तित्वात आल्यानंतर अवघ्या चार वर्षांच्या कालावधीत इयत्ता १ ते ७ पर्यंतची पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. मंडळनिर्मित इ.१ ते ७ पर्यंतची पाठ्यपुस्तके मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, इंग्रजी आणि सिंधी (अरबी व देवनागरी लिपीत) या सात भाषांत प्रकाशित करण्यात आली. राज्यात सन १९७२मध्ये १०+२+३ या नव्या आकृतिबंधानुसार इयत्ता ८ ते १०च्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना झाली. पुनर्रचित अभ्यासक्रमावर आधारीत इयत्ता ८ वी इतिहास, बीजगणित व भूमिती या विषयांची पाठ्यपुस्तके मंडळाने खाजगी प्रकाशनासोबतच प्रकाशित केली. सन १९७३-७४ पासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केलेल्या इयत्ता ८ ते १२च्या पाठ्यपुस्तकांची छपाई व वितरणांचे काम मंडळाने स्वीकारले. अशा प्रकारे आतापर्यंत मंडळाने इयत्ता १ ते ७ पर्यंतची एकूण ३९५ पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता ८ ते १२ पर्यंतच्या एकूण ३३१ पाठ्यपुस्तकांची निर्मिती व वितरण यांचे कामही मंडळ प्रतिवर्षी करत आहे. इयत्ता १ ते ७च्या भाषा व गणित या विषयांच्या नव्या मालेचे काम मंडळाने पूर्वीच क्रमश: हाती घेतले असून गणिताच्या मालेतील अखेरचे म्हणजेच इयत्ता ७ वीचे गणिताचे पाठ्यपुस्तक १९८४-८५ या वर्षी प्रकाशित झाले आहे. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीबरोबरच मंडळाने इयत्ता १ ते ७ पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्फूर्तिगीतांचे एक पुस्तक तयार करून ते प्रसिद्ध केले. पाठ्यपुस्तकांतील काही निवडक कविता तसेच स्फूर्तिगीतांतील काही गीते निवडून मंडळाने १८ गीतांच्या ध्वनिमुद्रिका प्रकाशित केल्या आहेत. त्यांचे संगीत दिग्दर्शन वसंत देसाई यांनी केले तसेच बालभारती गीतमंजुषा प्रसिद्ध करून या गीतांची स्वरलिपीही उपलब्ध करून दिली.

मराठी बालभारती इयत्ता पहिली हे मंडळाचे पहिले पुस्तक १९६८ मध्ये प्रकाशित झाले. २०१३ पासून बालभारतीच्या सहाव्या मालेचे प्रकाशन सुरू आहे. आठ भाषा माध्यमातून सर्व विषयांची पाठ्यपुस्तके तयार करणारे मंडळ हे बालभारतीचे वैशिष्ट्य आहे. बालभारती ही राज्यशासनाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेली स्वायत्त संस्था आहे. राज्याचे शिक्षणमंत्री हे या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. संस्थेचे सर्व धोरणात्मक निर्णय नियामक मंडळात घेतले जातात. पाठ्यपुस्तके तयार करण्याचे मुख्य काम विद्या विभागात चालते. विद्या विभागांतर्गत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू, गुजराती या आठ भाषा आणि इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण असे एकूण १४ विभाग आहेत. पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी विषयवार समित्या असतात. मंडळातील त्या त्या विषयाचे अधिकारी विषय समित्यांमध्ये सदस्य-सचिव म्हणून काम करतात. पाठ्यपुस्तकांखेरीज इतर अनेक पुस्तकांचे प्रकाशन बालभारती करते. ही पुस्तके अध्ययन-अध्यापनाला पूरक असतात. दि.१४ नोव्हेंबर १९७१पासून आठ ते १४ वर्षे वयोगटातल्या मुलांसाठी किशोर हे मासिक मंडळाने सुरू केले. त्यातील उत्तम साहित्याचे १४ खंड प्रकाशित झाले आहेत, हे कार्य उल्लेखनीयच! !! बालभारती मंडळ स्थापना दिनाच्या समस्त शिक्षणप्रेमी भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# तरुणाचा संशयास्पद मृत्यू तपास घातपाताच्या दिशेने?

**जनसंचलन/ सिंदखेडराजा** - जालना रस्त्यालगत मोती तलाव परिसरात आढळून आलेल्या तरुणाचा मृत्यू संशयास्पद असल्याचे समोर आले आहे. मृतकाच्या शरीरावर जखमा आढळून आल्याने पोलिसांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मोती तलावाच्या दक्षिण बाजूस, जालना रस्त्याला लागून असलेल्या नाल्यात जिजामाता नगर येथील संतोष प्रभू शिंदे याचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासात मृताच्या शरीरावर काही जखमा असल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे नैसर्गिक मृत्यू नसून घातपात असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बुधवारी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. मात्र, अद्याप डॉक्टरांचा अधिकृत अहवाल पोलिसांना प्राप्त झालेला नाही. अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या प्रकरणात पोलिस घातपाताच्या शक्यतेने तपास करत असून, मृताचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा शोध घेत आहेत. मृत्यूच्या पूर्वसंध्येला संतोष शिंदे कुठे होता, तो कोणाच्या संपर्कात होता, तसेच घटनास्थळी तो कसा पोहोचला याचा तपास सुरू आहे

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कोहलीला रणजी सामना खेळण्यासाठी केवळ इतकेच पैसे मिळणार




**दिल्ली:** विराट कोहली १३ वर्षांनंतर रणजी ट्रॉफी सामना खेळत आहे. डीडीसीए (दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशन) ने कोहलीच्या घरवापसी सामन्यासाठी सुमारे १०,००० प्रेक्षकांच्या उपस्थितीचा अंदाज लावला होता, जो रणजी ट्रॉफी सामन्यासाठी एक विक्रम आहे. कोहलीची जादू अशी होती की सर्व अनुमान खोटे ठरले आणि अपेक्षेपेक्षा जास्त लोक आले. टॉसच्या वेळी मैदानावर १२,००० हून अधिक प्रेक्षक उपस्थित होते.

**विराट कोहलीची रणजी ट्रॉफीची फी खूपच कमी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) स्थानिक वेतन रचनेनुसार, २०-४० रणजी करंडक सामने खेळणाऱ्या खेळाडूंना दररोज ५०,००० रुपये मिळतात. आतापर्यंत २३ रणजी सामन्यांमध्ये १,५४७ धावा करणारा विराट कोहली याच श्रेणीत येतो, म्हणजेच त्याला या सामन्यातून ५०,००० रुपये मिळतील. हे त्याच्या टीम इंडियासाठी + ग्रेड खेळाडू म्हणून वार्षिक ७ कोटी रुपयांच्या करारापेक्षा किंवा प्रत्येक कसोटी सामन्यासाठी त्याला मिळणाऱ्या १५ लाख रुपयांपेक्षा खूपच कमी आहे.जेव्हा भारताचा माजी कर्णधार त्याच्या दिल्लीच्या सहकाऱ्यांसह मैदानात आला तेव्हा दूरवरून कोहली कोहलीचे जयघोष ऐकू येत होते.

दिल्लीने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्याने कोहलीला फलंदाजी करताना पाहण्याची प्रेक्षकांची आशा लगेच पूर्ण झाली नाही, परंतु कोहलीची मैदानावर उपस्थिती प्रेक्षकांसाठी पुरेशी होती.कोहली दुसऱ्या स्लिपवर क्षेत्ररक्षण करत होता आणि त्याच्या प्रत्येक हालचालीचे कौतुक होत होते. १२ व्या षटकात, एका अतिउत्साही प्रेक्षकाने सुरक्षा घेरा तोडला, त्याच्याकडे धाव घेतली आणि त्याचे पाय स्पर्श केले. नंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला बाहेर काढले. येथे हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की विराट कोहली फलंदाजीच्या बाबतीत वाईट काळातून जात आहे. २०२४ हे वर्ष त्याच्यासाठी आव्हानात्मक ठरले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० विश्वचषक आणि बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये त्याची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी होती. विराट सध्या एकच चूक वारंवार करताना दिसत आहे आणि ती म्हणजे तो ऑफ स्टम्पच्या चेंडूवर खेळण्याचा प्रयत्न करतो आणि बाद होतो.

# वयाच्या साठाव्या वर्षी पुन्हा एकदा प्रेमात पडला आमिर खान?



**मुंबई:** बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट अभिनेता आमिर खान त्याच्या चित्रपटांशिवाय वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत येतो. अभिनेत्याने याआधी दोन वेळा लग्न केले होते, रीना दत्ता आणि किरण राव अशी त्याच्या पूर्वाश्रमीच्या पत्नींची नावे आहेत. किरण-आमिर यांचा २०२१ मध्ये घटस्फोट झाल्यानंतर तो पुन्हा एकदा अभिनेता प्रेमात पडला की काय, अशी चर्चा सध्या रंगली आहे. मीडिया रिपोर्टनुसार आमिरच्या आयुष्यात एका मिस्ट्री वुमनची एन्ट्री झाली असून या नात्याबद्दल गांभीर्याने विचार केला जातो आहे. आमिर खानच्या आयुष्याबद्दल आलेल्या या अपडेटविषयीचा तपशील फिल्मफेअरने शेअर केला. सूत्रांकडून फिल्मफेअरला अशी माहिती मिळाली की, आमिर खानची मिस्ट्री पार्टनर बंगळुरुमधील आहे. आपण त्यांच्या गोपनियतेचा आदर केला पाहिजे आणि कोणताही खासगी तपशील उघड करू शकत नाही, पण हे सांगता येईल की, आमिरने अलीकडेच या महिलेची त्याच्या संपूर्ण कुटुंबाशी ओळख करुन दिली. त्यांची ही भेट व्यवस्थित पार पडली.दरम्यान कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास आमिर सध्या त्याचा मुलगा जुनैद खानचा सिनेमा लव्हयापा प्रमोट करताना दिसला होता. सोशल मीडियावर जुनैद आणि खुशी कपूर यांच्या या चित्रपटावर टीका होत असली तरी, आमिर मोठ्या उत्साहाने लेकाच्या सिनेमाचे प्रमोशन करत होता. याशिवाय अलीकडेच त्याने इलू इलू या मराठी सिनेमाच्या स्क्रिनिंगलाही हजेरी लावली होती.आमिरने १८ एप्रिल १९८६ मध्ये रीना दत्ताशी लग्न केले होते. त्यांना जुनैद आणि आयरा अशी दोन मुले आहेत. आमिरच्या लगान या गाजलेल्या चित्रपटासाठी तिने निर्माती म्हणूनही काम पाहिले होते. त्यांचे नाते फार काळ टिकले नाही आणि २००२ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. यानंतर २८ डिसेंबर २००५ मध्ये आमिरने किरण रावशी लग्नगाठ बांधली. किरण लगानसाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम पाहत होती. किरण आणि आमिर यांच्या मुलाचे नाव आझाद आहे. आमिरचे दुसरे लग्नही २०२१ साली संपुष्टात आले. असे असले तरीही पूर्वाश्रमीच्या दोन्ही पत्नींसोबत त्याचे मैत्रीपूर्ण संबंध आजही कायम आहेत.

# कोणत्या वयात पालकांनी मुलांसोबत झोपणे बंद करावे?


## त्यांच्या मनावर होतो वाईट परिणाम

अनेक पालकांना त्यांच्या मुलासोबता झोपायला आवडते आणि मुले देखील त्यांच्या पालकांसोबत झोपतात. याचा फायदा बालक आणि पालक दोघांनाही होतो. एका अहवालानुसार, ३ ते ४ वर्षे वयाच्या मुलांना तुमच्यासोबत झोपू दिल्याने मुलांचे मनोबल वाढते, आत्मविश्वास वाढतो आणि मानसिक समस्या कमी होतात. मुलं मोकळ्या मनाची पोपटपंची होतात. पण तुम्हाला माहित आहे का की पालकांनी कोणत्या वयात मुलांना वेगळ्या बेडवर झोपवायला सुरुवात करावी आणि का? पण विशिष्ट वयापर्यंत मुलांनी त्यांच्या पालकांसोबत एकाच बेडवर झोपणे ठीक मानले जाते, परंतु काही काळानंतर पालकांनी मुलांना वेगळा बेड द्यावा. याचा फायदा दोघांनाही होईल. कारण रिपोर्टनुसार, ठराविक वयानंतर पालकांसोबत झोपल्याने मुलांना अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. ज्यामध्ये लठ्ठपणा, थकवा, कमी ऊर्जा, नैराश्य आणि खराब स्मरणशक्ती यासारख्या समस्यांचा समावेश होतो. त्याच वेळी, बर्याच काळापासून आपल्या पालकांसोबत झोपणाऱ्या मुलांच्या पालकांमध्ये मारामारी, तणाव आणि घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे.

**कोणत्या वयात मुलांना स्वतंत्र झोपण्याची सवय लावावी**

पालकांनी २ ते ३ वर्षे वयाच्या मुलांना स्वतंत्र झोपण्याची सवय लावायला हवी. कारण या वयात मुलांना स्वतंत्र झोपण्याची सवय सहज शिकता येते. तथापि, असे अनेक पालक आहेत जे त्यांच्या ७ ते ८ वर्षांच्या मुलांना त्यांच्यासोबत झोपू देण्यास प्राधान्य देतात. कोणत्या वयात पालकांनी मुलांसोबत झोपणे थांबवावे एका सर्वेक्षणानुसार, ४५ टक्के पालकांनी ८ ते १२ वर्षे वयाच्या आधी मुलांना वेगळे झोपायला लावले. तर १३ टक्के पालकांनी १२ वर्षांपर्यंतच्या मुलांना झोपण्यासाठी स्वतंत्र बेड दिले.


**एकाकीपणाचा अनुभव घ्या**



प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेणे महत्वाचे आहे आणि मुलासाठी एकटेपणाचा अनुभव घेणे देखील खूप महत्वाचे आहे. म्हणून, १० नंतर, एकटेपणा अनुभवण्याचे वय आहे. म्हणून, जर तुमचे मूल १० वर्षांचे असेल, तर त्याला/तिला वेगळ्या पलंगावर झोपण्याची सवय लावा.

**आत्मविश्वासाचा अभाव**

जोपर्यंत मुल एकटे झोपायला सुरुवात करत नाही तोपर्यंत त्याचा आत्मविश्वास निर्माण होणार नाही आणि हे तेव्हाच घडेल जेव्हा तुम्ही त्याला १० वर्षांनंतर एकटे झोपण्यास प्रोत्साहित कराल. जर तुमच्या मुलाचे वय १० वर्षांपेक्षा जास्त असेल तर तुम्ही हे करण्यात उशीर करू नये.जर तुमचे मूल १० वर्षांचे असेल, तर यौवन सुरू झाले आहे



किंवा लवकरच सुरू होणार आहे. अशा परिस्थितीत, त्याच्यासाठी त्याचे शरीर समजून घेणे आणि त्यातील शारीरिक आणि मानसिक बदल स्वतः समजून घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे स्वतंत्र झोपण्याची सवय लावून त्याला जागा द्या.

**भीतीपासून मुक्त होत नाही**

जोपर्यंत मूल त्याच्या पालकांसोबत असते तोपर्यंत त्याला सुरक्षित वाटते. पण एका विशिष्ट वयापर्यंत पोहोचल्यानंतर, त्याला एकटे राहण्याच्या भीतीवर मात करावी लागेल आणि ते वय १० वर्षे किंवा त्याच्या आसपास असेल. १० वर्षांनंतरही मूल तुमच्या जवळ झोपत असेल, तर त्याच्या मनातून भीती दूर व्हायला जास्त वेळ लागू शकतो.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मनोज जरांगे पाटील यांचे मराठा समाजाला मोठे आवाहन...

वृत्तसंस्था/ लातूर

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे काही दिवसांपूर्वीच आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसले होते. गेल्या काही महिन्यांपासून जरांगे हे मराठी समाजाच्या आरक्षणासाठी लढा देताना दिसत आहेत. सरसकट मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची त्यांची मागणी आहे. अनेक दिवस त्यांनी उपोषण केले. विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा असे म्हटले होते. अनेकदा देवेंद्र फडणवीसांवर टीका करतानाही जरांगे दिसले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आक्रमक भूमिका जरांगेंनी घेतली. यावेळी त्यांनी अनेक गंभीर आरोपही केली. संतोष देशमुखांच्या कुटुंबियांच्या मागे आपण उभे असल्याचे त्यांनी म्हटले. आता नुकताच जरांगे यांनी मराठा समाजाला मोठे आवाहन केले आहे. मनोज जरांगे पाटील हे धाराशिव



जिल्हाच्या दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी लातूरमधील मुरूडमध्ये धावती भेट घेतली.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपली आरक्षणाची लढाई आपल्याला पूर्ण जिंकायची आहे. मी जे काम हातात घेतो ते काम कधीच मी अर्धवट सोडत नाही.

कायम एकजूट राहायचं आणि व्यसनापासून दूर राहा. आता ही आरक्षणाची लढाई थोडीशी शिल्लक आहे. त्यामुळे पुढच्या काळात ही मराठा समाजाने एकजूट राहा. राज्यातील संपूर्ण मराठा समाजाला पूर्ण आरक्षण मिळाल्याशिवाय आपण कोणीही मागे हटू नका. आपली लढाई ताकतीने लढायची आहे.सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर काही आरोप केले. हेच नाही तर त्यांनी हे देखील स्पष्ट केले की, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी धनंजय मुंडे हे वाल्मिक कराडसोबत मला भेटण्यासाठी आले होते. मला जर माहिती असते अगोदर यांचे कारनामे तर यांना उभे पण केले नसते, असे म्हणताना जरांगे हे दिसले. सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीनंतरही जरांगे यांनी संताप व्यक्त केला होता.

# शिवरायांचा अपमान हा महाराष्ट्राचा अपमान, राहुल गांधींच्या ट्विटवर एकनाथ शिंदेंची टीका...

वृत्तसंस्था/मुंबई

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती दिनी शुभेच्छा देत असताना, शिवरायांना श्रद्धांजली अर्पण करणारं ट्विट केलं. पण यावरुनच मोठा राजकीय गदारोळ बघायला मिळतोय. जयंतीदिनी श्रद्धांजली वाहायची नसते तर अभिवादन करायचं असतं, असं वंचित बहुजन आघाडीने देखील राहुल गांधी यांना सुनावलं आहे.



राहुल गांधी यांच्याकडून झालेल्या या चुकीमुळे त्यांच्या विरोधकांच्या हातात आयतं कोलित सापडलं आहे. राहुल गांधींवर आता चौफेर टीका होत आहे. सोशल मीडियावर राहुल गांधींना ट्रोल केलं जात आहे. या दरम्यान आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांनी राहुल गांधी यांचं वक्तव्य हे महाराष्ट्राचा अवमान करणारं आहे, असं म्हटलं आहे. तसेच महाराष्ट्राच्या महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांचा मी निषेध करतो. त्यांनी तमाम शिवभक्तांची माफी मागायला हवी, अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी मांडली. देश एकीकडे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करत आहे. दुसरीकडे राहुल गांधींचं जे श्रद्धांजलीवालं वक्तव्य समोर आलं आहे, ते अतिशय अपमानास्पद आहे. हा फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान नाहीय, तमाम शिवभक्तांच्या, लाखो-कोट्यवधी शिवभक्तांचा अपमान आहे, हा महाराष्ट्राचा अपमान आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.हे जाणूनबुजून असे वक्तव्ये करतात. हे चुकून वक्तव्य झालेलं नाही. त्यांनी अनेकवेळा स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अवमान केला आहे. आता तर त्यांची छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करण्यापर्यंतची हिंमत वाढलेली आहे. त्यामुळे त्यांनी या चुकीसाठी माफी मागायला हवीङ्कङ्क, अशी मागणी एकनाथ शिंदे यांनी केली.एकनाथ शिंदे यांनी यावेळी छावा चित्रपटावरही प्रतिक्रिया दिली.छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज हे खूप स्वाभिमानी होते. त्यांनी आपल्या धर्मासाठी स्वत:च्या प्राणाची आहुती दिली. तरीही आपल्या देशाचा स्वाभिमान त्यांनी सोडला नाही. त्यांना खूप त्रास दिला गेला. त्यांच्यावर किती अत्याचार झाला. त्यांचे डोळे काढले, जीभ कापली, अशी त्यांची अवस्था केली. याबाबत छावा चित्रपटात दाखवण्यात आलं आहे. मी अद्याप हा चित्रपट पाहिलेला नाही. पण मी नक्की हा चित्रपट पाहीन, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

# विकी कौशलच्या छावा मधील परफॉर्मन्सने भारावली आलिया भट्ट



वृत्तसंस्था/मुंबई

विकी कौशलचा बहुप्रतिक्षित ऐतिहासिक चित्रपट छावा १४ फेब्रुवारीला प्रदर्शित झाला आणि त्याने प्रेक्षकांना जबरदस्त अनुभव दिला. चित्रपटातील भव्यता, दमदार कथा आणि विकीचा अप्रतिम अभिनय यामुळे हा चित्रपट चर्चेचा विषय ठरला आहे. अनेक कलाकार आणि चाहत्यांनी विकीच्या अभिनयाचं कौतुक केलं आहे, आणि आता आलिया भट्टनेही त्याच्या परफॉर्मन्सबद्दल उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली आहे. आलियाने विकीचा छावा मधील एक प्रभावी फोटो शेअर करत लिहिलं, विकी कौशल! तू नक्की काय आहेस???? छावा मधील तुझा अभिनय बघून थक्क झालेय. तिच्या या पोस्टमुळे चाहत्यांमध्ये चित्रपटाबद्दलची अधिक चर्चा सुरू झाली आहे.लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित छावा हा छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक चित्रपट आहे. भव्य सेट्स, अप्रतिम युद्ध दृश्ये आणि उत्कंठावर्धक पटकथा यामुळे प्रेक्षकांना हा चित्रपट एका ऐतिहासिक प्रवासाला घेऊन जातो. विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारताना केलेली मेहनत स्पष्टपणे दिसून येते, आणि त्याच्या अभिनयाने सर्वांनाच प्रभावित केलं आहे.आलिया भट्ट ही बॉलिवूडमधील आघाडीची अभिनेत्री असून तिची मतं लोक गांभीर्याने घेतात. त्यामुळे तिच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर छावा बद्दल आणखी चर्चा वाढली आहे. चाहत्यांनीही विकीच्या अभिनयाची प्रशंसा करत त्याला एक परिपूर्ण अभिनेता म्हणून गौरवलं आहे.छावा प्रदर्शित झाल्यापासून बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. प्रेक्षक आणि समीक्षक दोघांनीही या चित्रपटाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आता आलिया भट्टसारख्या मोठ्या कलाकाराने विकीच्या अभिनयाचं कौतुक केल्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्याच षटकात पाकिस्तानला मोठा धक्का



**वृत्तसंस्था/ कराची**

पाकिस्तानला चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्याच्या पहिल्याच षटकात आता मोठा धक्का बसला आहे. कारण पहिल्याच षटकात पाकिस्तानचा मॅचविनर खेळाडू दुखापतीमुळे मैदानाबाहेर गेल्याचे आता समोर आले आहे. त्यामुळे या गोष्टीचा मोठा फटका आता पाकिस्तानलाा बसला आहे. ही गोष्ट घडली ती पहिल्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर. त्यावेळी शाहीन आफ्रिदी हा गोलंदाजी करत होता, तर न्यूझीलंडचा सलामीवीर विल यंग हा स्ट्राइकवर होता. पहिल्या चेंडूवर एकही धाव निघाली नव्हती. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवर विल यंगने एक जोरदार फटका मारला. हा फटका एवढा दमदार होता की, तो चौकार जाईल, असे दिसत होते. पण त्यावेळी पाकिस्तानच्या मॅचविनर खेळाडूने हार मानली नाही. हा खेळाडू चेंडूच्या मागे जीवाचे रान करून धावत होता. चेंडूला सीमारेषेच्या अलीकडे रोखण्यात हा खेळाडू यशस्वी ठरला खरी, पण त्यावेळी त्यालाच मोठा धक्का बसल्याचे पाहायला मिळाले. चेंडू अडवताना पाकिस्तानसाठी मॅचविनर ठरलेल्या फखर झमान हा मैदानात पडला. मैदानात पडल्यावर त्याने उठण्याचा प्रयत्न केला आणि त्यावेळी त्याला ही गंभीर दुखापत झाल्याचे समोर आले आहे. फखरच्या पाठीला यावेळी गंभीर दुखापत झाली. त्यामुळे त्याला उठताही येत नव्हते. फखरची अवस्था पाहून पाकिस्तानच्या डॉक्टरांनी मैदानात धाव घेतली आणि त्यांनी त्याच्यावर प्राथमिक उपचार केले. फखरची दुखापत एवढी गंभीर होती की, तो खेळू शकणार नाही हे स्पष्ट झाले होते. त्यामुळे डॉक्टरांनी त्याला न खेळण्याचा सल्ला दिला आणि त्याला मैदान सोडावे लागले. त्यानंतर पाकिस्तानला फखरच्या बदली खेळाडू देण्यात आला. पण बराच काळ फखर हा मैदानाच्या बाहेर होता. त्यामुळे फखर या सामन्यात खेळणार की नाही, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पाकिस्तानसाठी हा मोठा धक्का असल्याचे आता समोर आले आहे. पाकिस्तानला पहिल्याच षटकात मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आता फखर झमान मैदानात खेळण्यासाठी उतरणार की नाही, याची उत्सुकता चाहत्यांना लागलेली असणार आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफीच्या भारतीय संघात सर्वात मोठी चूक, दिनेश कार्तिकने गंभीर यांच्यावर डागली तोफ...





**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

चॅम्पियन्स ट्रॉफीला आता सुरुवात झाली आहे. भारताचा पहिला सामना हा फक्त काही तासांवर येऊन ठेपलेला आहे. पण त्यापूर्वीच भारताचा माजी क्रिकेटपटू दिनेश कार्तिकने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी निवड करण्यात आलेल्या संघातली मोठी चूक दाखवली आहे. ही चूक दाखवत असताना कार्तिकने भारताचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावर तोफ डागली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघ ऐनवेळी बदलण्यात आला होता. जसप्रीत बुमराह खेळणार नसल्याचे अखेरच्या दिवशी समजले आणि त्यानंतर हर्षित राणाला भारताच्या संघात स्थान देण्यात आले. भारतीय संघात अजून एक मोठा बदल करण्यात आला. भारताचा युवा सलामीवीर यशस्वी जयस्वाल हा चांगल्या फॉर्मात होता आणि त्यामुळेच त्याला चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघात स्थान देण्यात आले होते. पण अखेरच्या क्षणी यशस्वी जयस्वालला संघाबाहेर करत वरुण चक्रवर्तीला संधी देण्यात आली होती. त्यानंतर आता दिनेश कार्तिकने भारतीय संघातील सर्वात मोठी चूक दाखवून दिली आहे. दिनेश कार्तिक म्हणाला की, ङ्कभारताचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील सर्व सामने हे दुबईत होणार आहेत. दुबईत खेळताना संघात चार फिरकीपटू असणे ठीक आहे, पण पाचव्या फिरकीपटूची संघात काहीच गरज नव्हती. त्यापेक्षा एक चांगला फलंदाज संघात असायला हवा होता. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, जेव्हा जसप्रीत बुमराह चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळू शकत नसल्याचे समजले तेव्हा त्याच्या जागी हर्षित राणाला भारतीय संघात स्थान देण्यात आले होते. पण बुमराहच्या जागी मोहम्मद सिराजला संधी द्यायला हवी होती, कारण सिराजकडे मोठ्या स्पर्धा खेळण्याचा हर्षित राणापेक्षा जास्त अनुभव आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीच्या संघात ही सर्वात मोठी चूक असल्याचे मला वाटते. ङ्क हर्षित राणाला गौतम गंभीर यांच्यामुळे भारतीय संघात स्थान मिळाले, हे सर्वांनाच माहिती आहे. पण दिनेश कार्तिकने यावेळी गौतम गंभीर यांचे नाव न घेतादेखील त्यांच्यावरच तोफ डागली आहे.जसप्रीत बुमराहला दुखापत झाल्यावर संघात लगेच हर्षित राणाला संधी का देण्यात आली, असा प्रश्नही आता चाहते विचारायला लागले आहेत.

# वीटभट्टी ते थेट तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात भरारी, एका कष्टाळू मुलीच्या जिद्दीची कहाणी...

**वृत्तसंस्था/ रायगड**

कर्जत तालुक्यातील अति दुर्गम भागात असणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या झुगरेवाडी शाळेत इयत्ता आठवीत शिक्षण घेणाऱ्या अंजली भास्कर वाघ या विद्यार्थिनीने नुकत्याच झालेल्या तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात मोलाची कामगिरी बजावली आहे. तर या विज्ञान प्रदर्शनात अंजलीने तालुका व जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकवला आहे. तर राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात अंजली हिने तिच्या विज्ञान प्रकल्पाचे उत्कृष्टपणे सादरी करण केल्याने, आयोजकांनी अंजलीच्या पाठीवर कौतुकाची थाप देत तिचे मनापासुन कौतुक ही केले आहे. इतर विद्यार्थी यांच्या तुलनेत अंजली हिने तालुका,जिल्हा व राज्यस्तरीय प्रदर्शनात आपल्या विज्ञान प्रकल्पाचे उत्कृष्ट सादरीकरण करत, आपल्या शाळेचे व शिक्षकांचे तसेच गाव व तालुक्याचे नावलौकिक वाढवल्यामुळे अंजली हिचे सर्व स्तरावरून कौतुक व अभिनंदन केले जात आहे. रायगड जिल्हयाचे शेवटचे टोक व कर्जत तालुक्यातील अती दुर्गमबहुल भाग असलेल्या झुगरेवाडी येथील कु.अंजली भास्कर वाघ ही काही काळ शाळाबाह्य होती. मात्र ती हुशार असूनही केवळ परिस्थितीमुळे तीला तीच्या आई वडिलांसोबत वीटभट्टी वर जावे लागले होते. अंजली ही हुशार असल्याने, झुगरेवाडी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक रवी काजळे व सतीश घावट यांनी तिच्या पालकांशी संपर्क साधून तुमची मुलगी हुशार आहे, तिला कृपया शाळेत पाठवा असे सांगितल्यावर वडिलांनीही शिक्षकांचे म्हणणे ऐकून तिला शाळेत पाठवण्यास सुरू केले. शाळेत सर्व सोयी सुविधा उपलब्ध असल्याने अंजलीला अभ्यासाची व शाळेची आवड निर्माण झाली. यातूनच विज्ञान शिक्षक राजश्री पाटील व नंदादीप चोपडे यांनी तिच्यावर विश्वास ठेवून रस्ते सुरक्षा या प्रकल्पासाठी तिची तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड केली. आपल्या प्रभावी वकृत्वाची चमक दाखवत अंजलीने तालुका व जिल्ह्यात आदिवासी गटातून प्रथम क्रमांक मिळवत, अमरावती येथील श्री शिवाजी विज्ञान विद्यालय येथील आयोजित राज्यस्तरीय ५२ व्या विज्ञान प्रदर्शनात विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला. झुगरेवाडी शाळेच्या स्थापनेपासून राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात संधी मिळण्याची ही पहिलीच वेळ. त्यामुळे तिने मिळविलेले यश हे उल्लेखनीय आहे. अंजली हिला जर शिक्षकांनी शाळेत आणले नसते तर शाळा आशा एका गुणी विद्यार्थिनी मुकली असती. असे झुगरेवाडी येथील रायगड जिल्ह परिषद शाळेतील शिक्षकांकडून उदगार काढण्यात आले आहे. दरम्यान, ङ्कसुरुवातीला मी काही दिवस शाळेत व काही दिवस वीटभट्टी वर असा माझा प्रवास सुरू होता. इच्छा असूनही मला शिकता येत नव्हते परंतु मुख्याध्यापक रवी काजळे यांनी माझ्या वडिलांना सांगून मला शाळेत आणले त्यामुळे मला राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी होता आले. त्याबद्दल मी सर्व शिक्षकांची व माझ्या पालकांची खूप आभारी आहे. असे अंजलीने म्हटले.

# सुट्टीत काय करायचं?



कॉलेजच्या परीक्षा संपल्यावर येणा-या मोठय़ा सुट्टीत नेमकं काय करायचं? हा प्रत्येकालाच पडलेला प्रश्न असतो. घरी नुसतं लोळत पडण्यापेक्षा किंवा मित्र-मैत्रिणींसोबत चकाटय़ा पिटण्यापेक्षा स्वत:ला उपयोगी पडेल असं काहीतरी करावं, असं आपल्याला वाटत असतं. पण नेमकं काय करायचं हा विचार संपता संपत नाही, पण तेवढय़ात सुट्टी मात्र संपत येते. तुमच्यावर ही वेळ येऊ नये म्हणून आम्ही तुम्हाला थोडी मदत करणार आहोत.

कॉलेजच्या परीक्षा संपल्यात आणि भलीमोठ्ठी दोन-अडीच महिन्यांची सुट्टी आता समोर ठाकली आहे. वर्षाअखेरच्या या परीक्षेनंतरची ही मोठी सुट्टी म्हणजे आपल्या सर्व ग्रुपसमोरच एक भलामोठ्ठा प्रश्न असतो, नाही का? या सुट्टीत ग्रुपची काही काळापुरती का होईना ताटातूट होणार असते. एवढे दिवस ग्रुपशिवाय राहायचं म्हणजे शिक्षाच जणू.. त्यामुळेच ग्रुपशिवाय ही सुट्टी काढायची कशी ही चिंता सतावत असते.

एकूणच ही उन्हाळ्याची सुट्टी खूप सारे प्रश्न घेऊन येते. पण सर्वात मोठा प्रश्न हाच असतो की, या सुट्टीत करायचं काय? घरी पालक, कुटुंब यांच्याबरोबर वेळ काढू, त्यांच्यासोबत सहलीला जाऊ, पण अखेर किती काळ तुम्ही घरात राहणार? अर्थात वर्षभर अभ्यास करून आता थोडं रिलॅक्स करायचे हे दिवस आहेत म्हणा, ते जरुरी पण आहेच. सुट्टीत टाईमपास इज मस्ट!

आता तुम्ही हवं ते करायला अगदी मोकळे आहात. तेव्हा तुम्हाला हवं ते वाचा, हवं तिथे जा, हवी ती मजा करा, कोणीही अडवणार नाहीये. सुट्टी सुरू झाली की मित्र-मैत्रिणींसोबत टाईमपास काय करायचा हे तर पहिल्यापासूनच ठरलेलं असतं, मग त्यात मूव्ही असतो, पार्टी असते, एखाद्या अम्युझमेंट पार्कला भेट असते, खाऊपिऊगिरी असते, अशी सर्व धम्माल तर योजूनच ठेवलेली असते.

पण थोडं रिलॅक्स झाल्यानंतर आणि ही सर्व मजामस्ती करून झाल्यानंतर पुढे काय? अनेकांचे आई-बाबाही दिवसा घरी नसतात, तेव्हा घरी बसून करणार तरी काय असा मोठ्ठा प्रश्न पडतो. मग अंगावर चालून येतो मोठ्ठा कंटाळा. अखेर झोपा काढून काढून तरी किती काढणार ना? तेव्हा या सुट्टीत आई-बाबा किंवा मोठय़ा भावंडांच्या पाठी माझ्यासाठी वेळ काढा असा धोशा लावण्याऐवजी तुम्हीच तुमच्या वेळेचा छानसा उपयोग का नाही करत? नाही तरी कोणीतरी म्हटलेलंच आहे की, शिकण्याचा एकही क्षण फुकट घालवू नका व आपण तर अजून विद्यार्थीच आहोत. मग या वेळेचा चांगला उपयोग करणं हे आपल्याच हाती आहे. नंतरच्या वयातही तुम्हाला हवे असलेले छंद-आवडी हे जोपासता येतात, नवी कौशल्यं शिकता येतात, पण तेव्हा तुमची बाहेरच्या जगात स्वत:च्या पायावर उभं राहण्याची धडपड सुरू असते. त्यावेळी हवी तेवढी एकाग्रता व वेळ आपण हाती घेतलेल्या इतर आवडीच्या कामासाठी देऊ शकत नाही. कदाचित त्यावेळी तुमच्यावर कुटुंबाची किंवा इतर काही जबाबदारी असू शकेल.

म्हणूनच आता कॉलेजच्या या सुट्टीचा एखादं छानसं कौशल्य शिकून घेण्यासाठी किंवा एखाद्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी वापर करा. मग आता उठा, मनासारखं लोळून झालं असेल, तर आता मेंदू व मनासाठीचा खुराक सुरू करा. त्यासाठी या सुट्टीत सर्वप्रथम एक काम करा, रोजची सर्व वर्तमानपत्रं नजरेखालून घाला. वृत्तपत्रात रोज महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी काही ना काही नवे उपक्रम येतच असतात. इंटरनेटवरची ग्रुप नोटिफिकेशन्स पाहा. मित्र-मैत्रिणींकडे ते या सुट्टीत काय करणार आहेत, त्यांचे काय प्लॅन्स आहेत याची चौकशी करा. याचा एक फायदा असा की, तुम्हालाही तुमच्या आवडत्या फ्रेण्ड्ससोबत एखादी ॲक्टिव्हिटी शिकता येईल. ग्रुपमधील मित्र-मैत्रिणींसोबत सुट्टीत एखादी गोष्ट करायची किंवा शिकायची म्हणजे धम्मालच. तुम्ही समजा फोटोग्राफी शिकणार असाल, तर फोटोग्राफी आवडणा-या एखाद्या फ्रेण्डला तुमच्यासोबत घ्या व दोघांनी मिळून त्याचा आनंद घ्या. फ्रेण्ड्ससोबत असण्याचा मोठा फायदा हा की तुम्ही एखादी गोष्ट शिकत असाल तेव्हा त्याचं मूल्यमापन एकमेकांना करता येईल. म्हणजे शिकताना एखादी गोष्ट समजली नसेल, चुकली असेल तर ती समजावून घेता येईल. शिवाय आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत काही वेगळं कौशल्य शिकण्याचा आनंद हा औरच असतो.

मात्र ते सोबत नसले तरीही तुम्ही तुमच्या आवडीच्या विषयामध्ये, छंदासाठी काय नवं शिकता येईल याचा शोध घ्या. एखादं अवगत असलेलं कौशल्य अजून विकसित करण्याचा प्रयत्न करा. उदाहरणार्थ तुम्हाला रॉक क्लायबिंग येत असेल, तर प्रत्यक्ष ट्रेकिंगमध्ये त्याचा कसा उपयोग करता येईल हे शिकून घ्या. दोन-अडीच महिने हा मोठा काळ आहे. साधारणत: जूनमध्ये वगैरे कॉलेज सुरू होईल. एवढय़ा कालावधीत तुमचा एखादा कोर्स नक्कीच होईल. अभिनय शिबिरात किंवा एखाद्या रॅपलिंग कॅम्पमध्ये तुम्हाला जाता येईल.

अशा कोणत्याही आवडत्या ॲक्टिव्हिटीमध्ये तुम्ही स्वत:ला गुंतवू शकता. हा काळ असतो बाहेरच्या जगात पाऊल टाकण्यापूर्वीचा. म्हणूनच व्यावसायिक जगात जाण्याआधी कॉलेजच्या या सुट्टीचा तुम्हाला उत्तम उपयोग करून घेता येईल. तुमच्या भावी करिअरच्या किंवा नोकरीच्या दृष्टीने त्याचा तुम्हाला फायदाच होईल. उदाहरणार्थ तुम्ही लघुपट निर्मिती क्षेत्रात पुढे जाणार असाल, तर या सुट्टीत एखादा शॉर्ट फिल्म मेकिंगचा कोर्स करा, प्रत्यक्ष एखाद्या लघुपटाच्या किंवा माहितीपटाच्या निर्मिती प्रक्रियेत सामील व्हा, निर्मिती प्रक्रियेचा एखादा वेगळा कोर्सही तुम्हाला करता येईल. अशा कोर्सेसचा तुम्हाला निश्चितच फायदा होईल.


समजा कॉलेजनंतर पुढे लगेच नोकरी करण्याचा विचार असेल, तर त्यादृष्टीने एखादं कौशल्य शिकून घ्या. तुमच्या अभ्यासक्रमाला भविष्यात महत्त्व व वजन मिळवून देणारे काही कोर्स तुम्ही करू शकता. उदाहरणार्थ तुम्ही भाषा क्षेत्रात करिअर करणार असाल, तर भाषेसंबंधी काही अतिरिक्त कोर्स तुम्हाला या सुट्टीत करता येतील. शिवाय एखादी भाषा तुम्हाला अवगत असेल तर ती शालेय विद्यार्थ्यांनाही तुम्ही घरच्या घरी शिकवू शकता.

# अपुऱ्या झोपेने हृदयरोगाचा धोका

अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या नव्या संशोधनानुसार, खूप जास्त किंवा खूप कमी झोपणे तसेच निद्रानाश आणि स्लीप ॲपनियासारख्या झोपेच्या विकारामुळे हृदयरोगाचा धोका अधिक असतो. पुरेशी झोप न घेतल्यास वजन, वय, दैनंदिन क्रियांची पातळी किंवा सवयींवर थेट परिमाण होतो. त्यामुळे हृदयरोग होण्याची शक्यता जास्त असते. झोप हा अनेक व्याधींवरील सर्वोत्तम, सावधगिरीचा उपाय आहे, हे संशोधकांनी पुन्हा एकदा जगाला सांगितले. मात्र तरीही चांगली झोप येणे आणि त्या संदर्भात आपले पुरेसे लक्ष नसते. आरोग्य आणि तंदुरुस्तीसाठी व्यायाम-आहाराकडे अवाजवी लक्ष ेतो. अर्थात, ते चांगले आहे. शारीरिक तंदुरुस्तीसाठी योग्य जीवनशैलीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

त्यामध्ये पुरेशी, चांगली झोप अनिवार्यच आहे.शारीरिक-मानसिक ताण कमी करण्याचे झोप हे महत्त्वाचे साधन आहे. आपण अनेकदा झोपेकडे दुर्लक्ष करतातुमच्या हृदयाच्या आरोग्यावर झोपेचा थेट परिणाम होतो.झोपेमुळे शरीर-मनाच्या ऊर्जेची पुनर्प्राप्ती होत असल्याने हृदयावरील ताण कमी होतो.हे घडण्याचे कारण म्हणजे नॉनरॅपिड आय मूव्हमेंट अर्थात आपण स्वप्न पाहत नसतो ती स्थिती. झोपेत नंतदाब, हृदयाची गती कमी होते आणि श्वासोच्छ्वास स्थिर होतो. दुसरीकडे रॅपिड आय मूव्हमेंट म्हणजे तुम्हाला स्वप्ने पडतात आणि मेंदू तितकाच सक्रिय असतो ती स्थिती. म्हणजे दिवसभरात असतो तितका.

फरक एवढाच असतो की आपण शरीर हलवू शकत नाही.पुरेशी झोप न मिळाल्यास किंवा झोपेत व्यत्यय आल्यास तुमच्या हृदयाला नॉनरॅपिड आय मूव्हमेंटचा अजिबातच फायदा होत नाही. परिणामी उच्च नंतदाब, स्ट्रोक, उच्च कोलेस्टेरॉल आणि



मधुमेहाची शक्यता वाढते. अपुऱ्या झोपेमुळे दीर्घकालीन ताणतणाव, अतिरेकी खाणे, आळशीपणा, मानसिक विकारांमध्ये वाढ होते. याच्या एकत्रित परिणामातून हृदयविकाराचा धोका वाढतो.

# बुलढाण्यात ३९५ वी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

## छत्रपती शिवाजी महाराजांना जयंतीदिनी अभिवादन


जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे आराध्य दैवत, स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५वी जयंती बुलढाणा शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त जिल्हा प्रशासन आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरातील जिजामाता प्रेक्षागृह (स्टेडियम) परिसरात शिवजयंती उत्सव सोहळ्यात ङ्गजय शिवाजी, जय भारतफपदयात्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि रक्तदान शिबिरासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, माजी आमदार विजयराज शिंदे, अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे, बुलढाण्यातील नागरिक, विद्यार्थी व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. या शिवजयंती उत्सवात जिल्हा प्रशासनाच्यावतीने ङ्गजय शिवाजी, जय भारतफ पदयात्राही काढण्यात आली. या पदयात्रेदरम्यान आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्यासह मान्यवरांनी संगम चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करुन अभिवादन केले. तसेच जयस्तंभ चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, रमाई आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास फुलपुष्प अर्पण करुन अभिवादन केले. या पदयात्रेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी हिरीरिने सहभागी झाले होते. शिवजयंती उत्सव कार्यक्रमात राजमाता जिजाऊ यांना वंदन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिश पुतळ्याचे पूजन करुन मानवंदना देण्यात आली. तसेच भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले यासह व्यसन मुक्ती शपथ, बेटी बचाओ, बेटी पढाओची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात विविध कलाकारांनी नृत्य, पोवाडे आदी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले व आयोजकांच्या वतीने पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. शिवजयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी रक्तदान करुन सहभाग नोंदवला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांचेसह प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करुन शिबिरात योगदान दिले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात शिवजयंती साजरी

जनसंचलन/ बुलढाणा

जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी (महसूल) समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसिलदार विजय सवडे, यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला फुलपुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# कोलवड येथे कृषी ड्रोन प्रात्यक्षिक...

जनसंचलन/बुलढाणा

तालुक्यातील कोलवड येथे कृषी विभाग आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्स यांच्या पुढाकाराने कृषी ड्रोन प्रात्यक्षिक व जनजागृती शिबिर अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. या कार्यक्रमास शेतकरी, विद्यार्थी आणि कृषी व महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.हा उपक्रम जिल्हा कृषी कार्यालय आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास तहसीलदार विठ्ठल कुमरे, कृषी सहाय्यक रवींद्र म्हस्के, कृषी पर्यवेक्षक संदीप आंभोरे, कोलवडचे सरपंच कौतीकराव पाटील, जिजामाता महाविद्यालय प्राचार्य डॉ. सुरेश गवई तसेच प्राध्यापक व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रगतीशिल शेतकरी साहेबराव पाटील, यांनी या ड्रोन प्रात्यक्षिकाचा अनुभव घेतला. या कृषी ड्रोनच्या प्रात्यक्षिकात औषध फवारणी, पिकांचे आरोग्य परीक्षण आणि अचूक शेती तंत्रज्ञानाचा माहिती देणयात आली. कृषी यांत्रिकीकरण उप-अभियानांतर्गत शेतकऱ्यांसाठीच्या शासकीय योजना व अनुदानाची माहिती देण्यात आली. आधुनिक शेती तंत्र आणि कृषी तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधून रोजगाराच्या संधींवर चर्चा करण्यात आली. या प्रात्यक्षिकादरम्यान शेतकरी व विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष सहभागासह प्रश्नोत्तर सत्र् घेण्यात आले तसेच ड्रोन शेतीचे फायदे आणि नियमांविषयी माहिती देण्यात आली. या ड्रोन प्रात्यक्षिकासाठी कृषी विभाग आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल कस्तुरे पुढाकार घेत त्यांच्या कार्यालयातील कोमल शेलके आणि निलेश बाहेकर यांच्या सहकार्य हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# पदयात्रा आणि प्रभात फेरीने मातृतीर्थ सिंदखेड राजा शहर दुमदुमले!

जनसंचलन/ सिंदखेडराजा



स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. राजवाडा परिसरात सकाळी अभिवादन कार्यक्रम पार पडला. शासनाच्या निर्देशानुसार स्थानिक प्रशासनाने जय शिवाजी, जय भारत पदयात्रेचे आयोजन केले होते. बुधवारी सकाळी ९:०० वाजता राजवाडा परिसर विद्यार्थी, नागरिक, राजकीय पदाधिकारी, प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीने गजबजून गेला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. आमदार मनोज कायंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अ.प.) जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे, तहसीलदार अजित दिवटे, नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे, पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी अंकुश म्हस्के, नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सिंदखेड राजा शहरात विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. राष्ट्रवादीच्या वतीने अभिवादन आमदार मनोज कायंदे, जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, देविदास ठाकरे यांच्यासह राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत राजवाडा परिसरातील महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. दुधाचा अभिषेक करून अश्वारूढ पुतळ्याची पूजा करण्यात आली. स्वामी समर्थ केंद्र शहरातील स्वामी समर्थ केंद्राच्या सेवेकऱ्यांनी राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून जिजाऊ वंदना केली

# मुलांच्या किरकोळ भांडणावरून चाकूहल्ला तिघांना अटक



**जनसंचलन/ पिंपळगाव सराई**

लहान मुलांच्या किरकोळ वादातून चार जणांनी व्यक्तीवर चाकूने हल्ला केला व त्यांच्या पत्नीला मारहाण केल्याची घटना रायपूर येथे घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीवर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी तिघांना अटक केली असून, चौथा आरोपी अद्याप फरार आहे. एका बुलढाणा तालुक्यातील रायपूर येथे मोहंमद जाबीर मोहंमद नजीर आणि खान कुटुंबातील युवकांमध्ये १४ फेब्रुवारीला मुलांच्या भांडणावरून वाद निर्माण झाला. वादाचे तीव्र रूप घेऊन जावेद खान मानू खान, नुमान खान मानू खान, हैदर खान मानू खान व सरफराज खान मानू खान यांनी मोहंमद जाबीर यांच्यावर हल्ला चढविला. त्यांना चाकूने भोसकण्यात आले, तसेच त्यांच्या ४ जणांनी किरकोळ वादातून केला हल्ला. पत्नी निशादबी यांनाही मारहाण करण्यात आली. या घटनेनंतर निशादबी यांनी १५ फेब्रुवारीला रायपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून जावेद खान, नुमान खान आणि हैदर खान या तिघांना १८ फेब्रुवारीला अटक केली. मात्र, सरफराज खान फरार असून, त्याचा शोध सुरू आहे. अटक आरोपींना १७फेब्रुवारीला न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार दुर्गेश राजपूत करत आहेत. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले शस्त्र व दुचाकी जप्त केली असून, पुढील तपास सुरू आहे. प्रकरणातील फरार एका आरोपीला शोधण्याचे सध्या पोलिसांसमोर आव्हान आहे.

# गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्र विभागातर्फे एलईडी बल्ब निर्मिती कार्यशाळा संपन्न

**जनसंचलन/ खामगाव**

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारा संचलित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागा तर्फे एलईडी उत्पादनावर आधारित अत्यंत माहितीपूर्ण हँड्स-ऑन इंटर्नशिप प्रोग्राम कार्यशाळा १७ फेब्रुवारी २०२५ रोजी गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील भौतिकशास्त्र विभागात यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली . या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानातील प्रत्यक्ष ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करणे होता. सदर कार्यशाळेत विद्यार्थ्यांना १५ वॅटच्या बल्ब उत्पादनाची प्रक्रिया शिकवली गेली. या कार्याकामास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर, तर प्रमुख मार्गदर्शक श्री विद्युत समूहाचे चे संचालक श्री. सुधाकर करांगे व उद्घाटक रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमंत चांडक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे समन्व्यक म्हणून भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय हरगुणानी होते. त्यांनी प्रास्ताविक भाषणात कार्यशाळेचे भूमिका व आयोजनाचे मुख्य उद्देश बद्दल माहिती तसेच भविष्यातील भौतिकशास्त्रातील कौशल्यपूर्ण संधी उपलब्धते वर मार्गदर्शन केले . तर डॉ. हेमंत चांडक यांनी या उपक्रमांची महत्त्वता सांगितली, ज्यामुळे सैद्धांतिक शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुप्रयोग यामधील अंतर कमी होईल. डॉ. हेमंत चांडक यांनी या कार्यशाळा आयोजनासाठी उत्साह व्यक्त केला आणि विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी या संधीचा फायदा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि आधुनिक जगातील तंत्रज्ञानाच्या वाढत्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी विभागांमध्ये सहकार्याच्या माध्यमातून अशा कार्यशाळांचे आयोजन करणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले आणि भविष्यात अधिक अशा उपक्रमांना समर्थन देण्याची इच्छा व्यक्त केली. ही कार्यशाळा श्री. सुधाकर करंगे, श्री इलेक्ट्रिकल कन्सल्टन्सी, खामगाव यांचे तज्ञ मार्गदर्शनाखाली पार पडली. श्री. करंगे यांनी उत्पादनाच्या प्रत्यक्ष पैलूंवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, साहित्याची निवड आणि असेंब्ली प्रक्रिया यांचे विश्लेषण केले. त्यांनी उद्योगातील दृष्टीकोन आणि सर्वोत्तम पद्धती विद्यार्थ्यांसोबत शेअर केल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या वास्तविक जगातील अनुप्रयोगांची समज मिळाली.या कार्यक्रमात भौतिकशास्त्र विभागातील ४६ विद्यार्थी सहभागी झाले होते, ज्यांना उत्पादनाबद्दल शिकण्याची आवड होती. सहभागी विद्यार्थ्यांनी एलईडी निर्मिती मध्ये भाग घेतला, ज्यामुळे त्यांना मौल्यवान तांत्रिक तज्ञता मिळाली आणि नवकल्पना साधण्याची भावना विकसित झाली. त्यांनी प्रत्यक्ष १०० बल्ब तयार केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. रविंद्र चव्हाण यांनी केले तर प्रा. अमित शिंदे यांनी आभार व्यक्त करत, अतिथी आणि उपस्थितांचे योगदान यासाठी धन्यवाद दिले. मुख्य वक्त्यांसोबतच इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. जयेश तातेड आणि प्रा. ईश्वर कराळे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. डॉ नंदकिशोर महल्ले, प्रा. श्रद्धा चव्हाण, प्रा. ऐश्वर्या देशपांडे, प्रा. प्रीती सचदेव आणि श्री. श्रीकांत सुल्ताने यांनी देखील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला. एकूणच हा इंटर्नशिप प्रोग्राम अत्यंत यशस्वी ठरला आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान आणि उद्योगामधील अनुभव प्राप्त करण्याची संधी दिली. गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयांमधील भौतिकशास्त्र विभाग विदयार्थ्यांच्या शैक्षणिक आणि तांत्रिक कौशल्यात उत्कृष्टता साधण्याच्या दृष्टीने नेहमीच पुढे राहिलेले आहे. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# मेहकर शहरात दुचाकी रॅलीने वेधले लक्ष

**जनसंचलन/मेहकर**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी शेकडो वर्षांची गुलामगिरी समाप्त करून रयतेचे स्वराज्य स्थापन केले. ते समतावादी, विज्ञानवादी, निष्पक्ष, नीतीमान आणि निर्भीड राजा होते. जगभरातील अनेक देशांनी त्यांच्या कार्याचे अनुकरण केले आहे. त्यामुळे छत्रपती शिवराय केवळ भारताचे नव्हे, तर संपूर्ण जगाचे प्रेरणास्थान आहेत, असे प्रतिपादन मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. शिवजयंतीनिमित्त आ. सिद्धार्थ खरात आणि उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे यांच्या नेतृत्वाखाली मेहकर शहरात भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात उद्धवसेनेचे कार्यालय, जानेफळ रोड येथून झाली. संपूर्ण शहराच्या मुख्य रस्त्यांवरून प्रवास करत पक्ष कार्यालयात रॅलीची सांगता करण्यात आली. हातात भगवे झेंडे घेतलेल्या तरुणांनी जय भवानी, जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय अशा गगनभेदी घोषणा देत संपूर्ण शहर दणाणून सोडले. रॅलीत शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबा पांडव, ॲड. आकाश घोडे, मेहकर शहराध्यक्ष



किशोर गारोळे, ॲड. संदीप गवई, संदीप गारोळे, परमेश्वर दहातोंडे, अमोल बोरे, श्याम पाटील, गोपाल गायकवाड आदी उपस्थित होते.

# विळ्याने हल्ला, महिला जखमी

**जनसंचलन/मोताळा**

किरकोळ कारणावरून एका महिलेला विळ्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना १८ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास खरबडी येथे घडली. या प्रकरणी सुनीता पुंडलिक तांबे यांनी बोराखेडी पोलिसात तक्रार दिली. सुरडकर हा मद्य प्राशन करून आपल्या घरासमोर शिवीगाळ करीत होता. सुनीता तांबे यांनी त्यास रोखण्याचा प्रयत्न केला असता, संतापलेल्या सुरडकरने घरातून विळा आणला आणि त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात महिला जखमी झाल्या आहेत. यावेळी आरोपीने शिवीगाळ करत जिवेमारण्याची धमकी दिली आहे

पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958